दिनांक २६ डिसेंबर २०१८

**कृपया प्रसिद्धीसाठी**

# पार्ले महोत्सवातून `भाई'च्या माध्यमातून वाहिली पुलंना आदरांजली

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व सुप्रसिद्ध साहित्यिक व पार्ले तसेच पार्लेकरांशी ऋणानुबंध असलेले पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने त्यांना 19 व्या पार्ले महोत्सवात आदरांजली वाहण्यात आली. त्यानिमित्ताने त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा `भाई : व्यक्ती की वल्ली' हा विशेष कार्यक्रम `भाई' या पुलंच्या व्यक्तिमत्वावरील आगामी चित्रपटाच्या कलाकारांशी संवाद साधून आयोजित केला गेला. यावेळी उपस्थितांना आयोजक भाजपा आमदार ॲड. पराग अळवणी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना ॲड. अळवणी यांनी सांगितले की, सांस्कृतिक नगरी असलेल्या विलेपार्ल्यात हा महोत्सव ही मुंबईकरांसाठी पर्वणीच आहे. त्यातून केवळ आनंदच नव्हे तर सहभागी होणा-या प्रत्येकाला त्यांच्या सुप्त गुणांना शोधण्याची एक संधी आहे तसेच यंदा महोत्सवाचे वेगळेपण म्हणजे सर्व सहभागींना संपूर्णतः संस्कृत भाषेत प्रशस्तीपत्र देत आहोत, ते देखील महोत्सवाला सीएम चषकाची जोड असल्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या सहीनिशी आहे. ही प्रत्येकाला त्यांनी दिलेली कौतुकाची थाप आहे.

साठ्ये महाविद्यालयात पद्मभूषण पु. ल. देशपांडे स्मृती कलानगरीत हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगतदार ठरला. दिग्दर्शक महेश मांजरेकर तसेच पुलंची व्यक्तिरेखा साकारणारे सागर देशमुख यांच्याशी प्रसिद्ध निवेदक अतुल परचुरे यांनी संवाद साधला तसेच भाईंच्या आठवणी एकेक पट उलगडत गेला. महोत्सवाच्या शानदार आयोजनाबद्दल दोन्ही कलाकारांनी प्रशंसोद्गार काढले. विद्या करालगीकर, अर्चना गोरे, अनिरुद्ध जोशी आदींनी पुलंनी संगीत दिलेले गीते गायली. `नाच रे मोरा' या पुलंच्या गीताने गायनाची सुरूवात झाली. यशोदा भूतकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी पार्ले महोत्सवात झालेल्या गायन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके दिली गेली. या स्पर्धेचे विशेष म्हणजे लहान वयाच्या स्पर्धकांपासून 82 वर्षीय शुभदा पटवर्धन यांचा यातील सहभाग. स्पर्धेचा पहिल्या तीन व उत्तेजनार्थ क्रमांकनिहाय निकाल असा : 10 ते 13 वयोगट - हिंदी - गौरी

मिश्रा, सृष्टी शर्मा, आयुष तावडे, साईश भणगे, हर्षवर्धन गोरे, मराठी - श्रावणी वागळे, अमृता धुमे व आयुषी पवार (विभागून), स्वरा डबीर, आयुष तावडे, 14 ते 17 वयोगट - सेदि्ध वेताळ, मीरा वाडेकर, 18 ते 25 वयोगट - हिंदी - पहिले दोन क्रमांक व उत्तेजनार्थ पारितोषिके - प्राची बावडेकर, मेधा चतुर्वेदी, सुजीत विश्वकर्मा, मराठी - प्रथम - प्राची बावडेकर, 26 ते 45 वयोगट - हिंदी - प्रज्ञा वळंजु, सुवर्णा क्षेमकल्याणी, मुग्धा दीक्षित, मराठी - प्रज्ञा वळंजु, मुग्धा दीक्षित, उत्तेज जाधव. 45 ते 59 वयोगट - हिंदी - नीला जोगळेकर, उमेश कुलकर्णी, सचिन शिदोरे व उत्तेजनार्थ - सुधीर खाडिलकर, मराठी - प्रियदर्शन गोंधलेकर, सुधीर खाडिलकर व उत्तेजनार्थ गीतांजली जाधव व संदीप टेमकर, 60 वर्षावरील वयोगट - हिंदी - अब्दुल शेखल, सुहास कुलकर्णी, मराठी - रामचंद्र गोखले, विनया गोरे व उत्तेजनार्थ गीता खानोलकर.